# वस्ती पेटली : मेळघाटातील चाकर्दात अग्नीतांडव

## एकावेळी अनेक संसारांची राखरांगोळी | सुदैवाने जिवितहानी नाही

**दिनेश सोनोने**

**धारणी (दि.5)** - मेळघाटातील धारणी तालुक्यामधील नागढाना इथल्या चाकर्दा भागात असलेल्या वस्तीमध्ये मंगळवारी रात्री 9 वाजताच्या सुमारास भीषण आग लागली. या आगीमध्ये एका रांगेत असलेली 6 घरं जळून खाक झाली. तसेच इतर 2 घरांचं किरकोळ नुकसान झाले. ही आग इतकी भयानक होती की अवघ्या काही वेळातच वस्तीतली अनेक घरे आगीच्या विळख्यात आली व बेचिराख झालीत. सुदैवाने आग लागली त्यावेळी नागरिक घरात नव्हते. त्यामुळे जीवितहानी टळली आहे. पण संसार उद्ध्वस्त झाले आहेत.





या आगीमध्ये दुचाकी वाहने, गॅस सिलेंडर, दागिने, अन्नधान्य, कपडे तसेच इतर जीवनावश्यक वस्तूही जळल्या आहेत. शेतातून आणलेली तूर आगीत भस्मसात झाल्याची माहिती मिळाली आहे. कष्टाने उभी केलेली घरं एका रात्रीमध्ये जळून खाक झाली. त्यामुळे अनेक कुटुंबे रस्त्यावर आली. गृहनिर्माण विभाग आणि स्थानिक प्रशासनाने लवकर मदत जाहीर करावी, अशी मागणी केली जात आहे. दरवर्षी आगीच्या घटनांमुळे मेळघाटातल्या आदिवासी कुटुंबांचे संसार उद्ध्वस्त होत असतात. पण तरीही मेळघाटामध्ये आग विझवण्याची यंत्रणा उपलब्ध नाही. मेळघाटातली अनेक घरे ही कुडाची आणि मातीची आहेत. हा दुर्गम भाग असून इथे शेकडो छोट्या वस्त्या आहेत. मेळघाटातल्या बहुतांश गावांमध्ये पाण्याची सुविधा नाही. त्यामुळे आग लागल्यानंतर ती कशी विझवावी, असा प्रश्न निर्माण होतो. प्रशासनाने या गोष्टीकडे लक्ष देण्याची गरज आहे. मेळघाटात अग्नीशमक बंब उपलब्ध करुन देण्याची गरज आहे. मेळघाटातल्या अनेक ठिकाणी टँकरदेखील उपलब्ध नसल्याची माहिती मिळाली आहे. मेळघाटातल्या गावांकडे प्रशासन दुर्लक्ष करत असल्याची भावना इथले नागरिक व्यक्त करत असतात. इथले लोकप्रतिनिधीदेखील याविषयी चिंता व्यक्त करत असतात. पण अद्याप प्रशासनाने इथल्या नागरिकांसाठी फारशा सोयी उपलब्ध केलेल्या नाहीत. आगीच्या घटना वारंवार घडू नयेत म्हणून विशेष काळजी घेण्याची गरज असल्याचंही सांगितलं जात आहे. धारणी ते चाकर्दा हे अंतर जवळपास 13 किलोमीटर आहे. नगर पंचायतचे अग्निशमन बंब जोपर्यंत पोहोचत नाही, तोपर्यंत येथील झोपड्यांची बेचिराख झाली होती.

### यांच्या घरांना लागली आग

- शंकरलाल मनाजी बेठेकर
- रवी मनाजी बेठेकर
- सुखराम पटेल कास्देकर
- सत्यम नंदलाल धुर्वे
- मुन्नी गणेश पाटणकर
- किसन मोती धुर्वे

### स्फोट झाल्याने मिळाली माहिती

दोन दुचाकी वाहने ठेवलेल्या एका घरामध्ये सर्वात आधी आग लागल्याची माहिती आहे. या झोपडीमध्ये वाहनाच्या पेट्रोल टाकी चा स्फोट झाल्यानंतर गावकऱ्यांना घटनेची माहिती मिळाली, त्यानंतर घटनास्थळी धाव घेवून आग विझविण्याचा प्रयत्न करण्यात आला. घटनेच्यावेळी यातील काही कुटूंबे बाहेरगावी गेले होते, अशीसुध्दा माहिती आहे.

### तहसील कार्यालयाकडून तातडीची मदत

आगीच्या घटनेनंतर उघड्यावर आलेल्या कुटूंबांना चाकर्दा येथील जिल्हा परिषद शाळेच्या इमारतीमध्ये आश्रय देण्यात आला. त्यांना तहसिल कार्यालयाकडून तातडीची मदत म्हणून धान्य व किराणा किट देण्यात आली. धारणी प्रकल्प कार्यालयाकडूनही पंचनामा करण्यात आला आहे. या कुटूंबांना तातडीची मदत म्हणून प्रत्येकी 20 हजार रुपये देण्यात येथील अशी माहिती कार्यालयाकडून देण्यात आली. तुर्तास हे कुटूंब आपआपल्या नातेवाईकांकडे आश्रयास आहे, आणि डोळ्यातील अश्रु पुसत राख रांगोळी झालेल्या संसाराला पुन्हा उभे करण्यासाठी कामाला लागले आहे.

# हातात शस्त्र घेवून दहशत पसरविणाऱ्या भावडांना अटक

**महासागर प्रतिनिधी**

**बडनेरा,(दि.5)** - येथील मिल चाळ परिसरात हातात चाकू घेवून दहशत पसरविणाऱ्या भावडांना बडनेरा पोलिसांना अटक केली. ही घटना मंगळवार(दि.4) रोजी घडली.



विकास उर्फ विक्की नामदेवराव गणवीर, (वय 31 वर्षे) व अनिकेत उर्फ अंत्या नामदेवराव गणवीर (वय 24 वर्षे दोघेही रा. मिलचाल नवी वस्ती बडनेरा) असे त्या भावंडांचे नाव आहे. त्याच्या ताब्यातून 12 इंच ब्लेड असलेला लोखंडी चाकू, 5.10 इंच लांबीचा लोखंडी हँडल आणि 2.5 इंच रुंदीचा चाकू जप्त करण्यात आला. दोन्ही आरोपी कुख्यात असून ते पॅरोलवर जेलमधून बाहेर आले आहेत. पॅरोल संपला असतानाही ते बाहेरच फिरत आहेत. आरोपींमुळे मोठी जीवितहानी होण्याची शक्यता नाकारता येत नाही. घटनेचे गांभीर्य पाहता, दोन्ही आरोपींचे कृत्य कलम 4, 25 शस्त्रास्त्र कायदा आणि कलम 135 एम.पी.ओ. अंतर्गत गुन्हा दाखल करुन त्यांना अटक करण्यात आली आहे.



### पती-पत्नीचा वाद, एकमेकांना मारहाण

**अमरावती** - पती-पत्नीतील वादात त्यांनी एकमेकांना मारहाण केली. या घटनेनंतर परस्परविरोधी तक्रारी करण्यात आल्या. लक्ष्मी सागर चव्हाण (25, रा. एरनगाव) यांच्या तक्रारीवरून चांदुररेल्वे पोलिसांनी आरोपी पती सागर सुभाष चव्हाण (30, रा. एरणगाव) याच्याविरुध्द गुन्हा नोंदविला आहे. तर सागर चव्हाणच्या तक्रारीवरून माहुली जहागिर पोलिस ठाण्यात पत्नीसह सासु, साळी व विलास जाधव (तिन्ही रा. डवरगाव) यांच्याविरुध्द गुन्हा नोंदविला आहे.

# मंगरूळ दस्तगीर मार्गावर वाहनाची दुचाकीला धडक

## एक युवक गंभीर तर दुसरा किरकोळ जखमी

**महासागर प्रतिनिधी**

**धामणगांव रेल्वे (दि.5)** - तालुक्यातील मंगरूळ दस्तगीर मार्गावर बेलीच्या नाल्याजवळ चार चाकी वाहनाने दुचाकीला (दि.5) धडक दिल्याने दोन युवक जखमी झाले.

मिळालेल्या माहितीनुसार जळगाव मंगरूळ येथून दुचाकीने धामणगाव रेल्वे येथे कामावर येणाऱ्या दोन युवकाच्या दुचाकी ला चार चाकी वाहनाने धडक दिली. आकाश अजबले (वय 24) हा या अपघातात गंभीर जखमी झाला असून, आशिष सावरबंदे (वय 23) हा किरकोळ जखमी झाला आहे. दोघेही युवक जळगाव मंगरूळ येथील रहिवासी आहे. सदर घटनेची माहिती काही नागरिकांनी रुग्णवाहिकेला दिली असता, रुग्णवाहिकेने जखमी युवकांना ग्रामीण रुग्णालय धामणगाव रेल्वे येथे आणण्यात आले. दोन्ही युवकावर ग्रामीण रुग्णालय धामणगाव रेल्वे येथे उपचार सुरू आहे. मंगरूळ दस्तगीर रोडवर दोन नाले आहेत. त्या दोन्ही नाल्यावर कठडे नसल्यामुळे अपघात होतात. त्यामळे कठडे बसविणे अत्यंत गरजेचे आहे तसेच सूतगिरणी चौफुली जवळ आणि जळगाव मंगरूळ चौफुलीवर ब्रेकर नसल्याने त्या ठिकाणी सतत अपघात होत आहे. या मार्गावरून शाळकरी विद्यार्थ्यांची रहदारी मोठ्या प्रमाणात आहे. त्यामुळ दोन्ही नाल्यावर कठडे तसेच चौफुलीवर ब्रेकर बसविण्यात यावे अशी मागणी जळगाव मंगरूळ येथील सरपंच मनोज शिवणकर यांनी केली आहे.


# करजगाव शेतशिवारात आढळला तरुणाचा मृतदेह

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,(दि.5)**- करजगाव गावालगत असलेल्या शेताच्या विहिरीत एका अज्ञात तरुणाचा मृतदेह, आढळून आला. ओळख पटल्यावर मृतकाचे नाव मंगेश रामलाल उईके (वय 18, रा. रामनगर करजगाव) असे मृताचे नाव आहे. मंगेश उईके हा मानसिक रोगी असून तो 28 फेब्रुवारी रोजी घरून निघून गेला होता. त्याचा नातेवाईकांसह इतर ठिकाणी गावात शोध घेण्यात आला. मात्र त्याचा कुठेच थांगपत्ता लागला नव्हता. अखेर 3 मार्च रोजी गावातील नागरिकांना राजेंद्र चर्जन यांचे मालकीच्या शेतात सायंकाळी एक अज्ञात तरुणाचा मृतदेह आढळला. याची चर्चा गावभर वाऱ्यासारखी पसरली. घटनेची माहिती शिरजगाव कसबा पोलिसांना मिळताच ते घटनास्थळी पोहचले. रात्री वेळ झाल्याने मृतदेह विहिरीबाहेर काढणे शक्य झाले नाही. दुसऱ्या दिवशी (दि.4) मृतदेह बाहेर काढल्यावर मृताची ओळख मंगेश उईके अशी पटली. पंचनामा करून मृतदेह उत्तरीय तपासणीकरिता अचलपूर उपजिल्हा रुग्णालयात पाठविण्यात आला. पुढील तपास शिरजगाव कसबा पोलिस करीत आहेत.

# आता ‘टेक ऑफ’ चा पुढच्या महिन्यात मुहूर्त

## बेलोरा विमानतळाची भारतीय विमानतळ प्राधिकरण चमूकडून चाचणी | अमरावती-मुंबई विमानसेवा




**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,(दि.5)** - भारतीय विमानतळ प्राधिकरणाच्या चमूकडून बेलोरा विमानतळावर मंगळवारी ‘हवाई कॅलिब्रेशन’ ही चाचणी पूर्ण करण्यात आली. त्यामुळे एप्रिलपासून विमानांचे ‘टेक ऑफ’ होणार असून, अमरावती-मुंबई 72 एटीआर विमानसेवेचा अमरावतीकरांना लाभ मिळेल. महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनीने हे महत्त्वपूर्ण पाऊल टाकले आहे.

विमानतळाची ‘पापी’ हवाई कॅलिब्रेशनद्वारे चमूने चाचणी केली. यात बेलोरा विमानतळाचे प्रेसिजन अप्रोच पाथ इंडिकेटरचे हवाई कॅलिब्रेशन पूर्ण केले आहे. विमानचालन सुरक्षिततेत आवश्यक साधन असलेली पापी प्रणाली, धावपट्टीवर येणाऱ्या विमानांना अप्रोच दरम्यान योग्य ग्लाइड स्लोप राखण्यासाठी आणि सुरक्षित लँडिंगसाठी सुनिश्चित करते. अमरावती - मुंबई विमानसेवा एप्रिलपासून सुरू होईल. पापी ‘कॅलिब्रेशन’ विमानतळाच्या पायाभूत सुविधांचा महत्त्वाचा घटक, हे विशेष.

### महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनीच्या संचालक हजर

- बेलोरा विमानतळाचे पापी हवाई कॅलिब्रेशन महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनीच्या उपाध्यक्ष स्वाती पांडे यांनी प्रत्यक्ष पाहिले आहे. त्या मुंबईहून आल्या होत्या.
- भारतीय विमानतळ प्राधिकरण, फ्लाइट इन्स्पेक्शन युनिटने बीच एअर 360 ईआर टर्बोप्रॉप विमानतळाने कॅलिब्रेशन केले. जे 7 सदस्यांच्या क्रूसह बंगळुरूहून विमानतळावर कॅप्टन अनूप काचरू आणि विमानचालन तज्ज्ञांच्या नेतृत्वाखाली करण्यात आले.
- विमानाने 26/08 धावपट्टीच्या बाजूने अमरावती विमानतळावरून उड्डाण केले आणि यशस्वीरीत्या कॅलिब्रेशन पूर्ण केले.
- पॅसेंजर टर्मिनल बिल्डिंग, एटीसी टॉवर्स आणि इतर सिव्हिल वर्क आधीच पूर्ण झाले आहे. अलायन्स एअर प्रादेशिक कनेक्टिविटी योजनेंतर्गत मुंबई-अमरावती-मुंबई मार्गावर एटीआर 72 सह नियोजित ऑपरेशन्स होईल.
- बेलोरा विमानतळावर लावण्यात आलेली सर्व उपकरणे आंतरराष्ट्रीय विमानचालन संस्थांद्वारे निर्धारित कठोर मानकांना पूर्ण करतात.

> बेलोरा विमानतळाचे मंगळवारी हवाई कॅलिब्रेशन झाले. आता केंद्रीय उड्डयन मंत्रालयातून प्रवासी वाहतूक परवाना लवकर मिळेल. साधारणत: एप्रिलमध्ये विमानांचे टेक ऑफ होईल.
>
> **- गौरव उपश्याम,**
> **प्रभारी प्रबंधक, बेलोरा विमानतळ**

### खा.बोंडेंनी घेतला आढावा

अमरावतीच्या बेलोरा विमानतळाचे काम पूर्ण झालेले आहे. धावपट्टी, इमारत निर्माण यासह सुसज्ज विमानतळासाठी आवश्यक असलेल्या सर्व सुविधा या ठिकाणी विकसित करण्यात आलेल्या आहेत. त्या संपूर्ण कामकाजाचा आढावा डॉ.अनिल बोंडे यांनी घेतला.



यावेळी विमानतळाच्या श्रीमती चावला, भूषण जीरापुरे यांच्यासह अन्य अधिकारी उपस्थित होते. नागरी उड्डाण संचालनालयाकडे उड्डाणा संदर्भातील आवश्यक असलेल्या परवानगीची प्रक्रिया अंतिम टप्प्यात आलेली आहे. मार्च महिन्याच्या अखेरच्या आठवड्यात ही प्रक्रिया पूर्ण होऊन एप्रिल महिन्यात बेलोरा विमानतळावरून प्रत्यक्षात उड्डाणाला सुरुवात होणार आहे. प्रथम अमरावती ते मुंबई 78 आसनी क्षमतेचे विमान बेलोरा विमानतळावरून टेकऑफ करणार आहे. या फ्लाईटला एटीआर असे म्हणतात. त्यामुळे लवकरच अमरावतीकरांना अमरावती वरून विमान प्रवासाची प्रतीक्षा पूर्ण होणार आहे. त्यानंतर रात्र कालीन प्रवासाची सुविधा देखील विमानतळ प्राधिकरणाकडून विकसित केली जाणार असल्याची माहिती सुद्धा डॉ.अनिल बोंडे यांनी दिली.


## अमरावती महानगरपालिका, अमरावती

**(बांधकाम विभाग- शहर अभियंता)**

**निविदा सुचना**

अमनपा/बां.वि/श.अ./नि.सु.क्र. /६८/२५/ दि. ०४/०३/२०२५

अमरावती महानगरपालिका शहर अभियंता, बांधकाम विभाग मधील मनपा निधी अंतर्गत करावयाच्या कामाचा निविदा प्रसिद्धीचा जा.क्र. ६८/२५ दि. ०४/०३/२०२५ नुसार मनपाच्या बांधकाम विभागातील नोटीस बोर्डवर सविस्तर निविदा प्रसिद्ध करण्यात आलेली आहे.

| | |
|---|---|
| मॅन्युअल-निविदा प्रसिद्धी | दि. ०४/०३/२०२५ |
| कोऱ्या निविदा करीता अर्ज करण्याचा दिनांक | दि. ११/०३/२०२५ |
| निविदा दाखल करण्याची अंतिम दिनांक | दि. १७/०३/२०२५ दु. ४.०० वाजेपर्यंत |
| मॅन्युअल-निविदा उघडण्याची दिनांक (Technical) | दि. १७/०३/२०२५ दु. ४.०० वा (शक्य झाल्यास) |

अमनपा/जसंवि/२६०/२०२५

दिनांक ५/३/२०२५

**शहर अभियंता**
**महानगरपालिका अमरावती**


आरएनआय ४६९७५/१९८५ महासागर अमरावती

मालक, मुद्रक, प्रकाशक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरूणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर १८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय, होटल टूरिस्टच्या बाजूला रेल्वे स्टेशन चौक, अमरावती येथे प्रकाशित केले. संपादक -श्रीकृष्ण तनसुखदास चांडक (पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर राहील) अमरावती मुख्य कार्यालय, पत्ता. दैनिक महासागर, होटल टूरिस्टच्या बाजूला रेल्वे स्टेशन चौक अमरावती, फोन नं. ९५१८९३४५०४

# जारीदा विद्युत उपकेंद्रात वन विभागाचा अडथळा

## मेळघाटातील 40 गावे अंधारात ● लोकप्रतिनिधींनी प्रयत्न करण्याची मागणी



**महासागर प्रतिनिधी**
**चुरणी,( दि.5 )** - चिखलदरा तालुक्यातील जी चाळीस गावे आजही अंधारात आहेत तेथे वीज पोहोचविण्यासाठी महत्वपूर्ण ठरणाऱ्या जारीदा येथील वीज वितरण कंपनीच्या सबस्टेशनची उभारणी झाली असली तरी वनविभागाच्या आडकाठीमुळे हे सबस्टेशन सुरू होऊ शकले नाही. परिणामी या 40 गावांना वीज उपलब्ध करून देण्याचा विषय अधांतरी सापडला आहे.

जारीदा 50 केव्हीचे हे सब स्टेशन सुरू झाल्यास या चाळीस गावांच्या विजेचा प्रश्न सुटण्यासोबतच दुर्गम भागातील खेडी, तांडा, वस्त्यांवर योग्य दाबाने वीजपुरवठा होऊन तेथील विजेची समस्या सुटण्यासही मोठी मदत होणार आहे.

जारीदा येथील विद्युत सब सेंटर तयार होऊन सहा महिन्यांचा प्रदीर्घ कालावधी उलटून गेला आहे. मात्र वनविभागाकडून आवश्यक कार्यवाही पूर्ण न झाल्याने हे केंद्र सुरू होऊ शकले नाही. हतरु परिसरातील सुमारे 40 ते 50 गावांमध्ये आजही वीज पोहोचलेली नाही. ही गावे पूर्णतः अंधारात असतात. दुर्गम भागातील अनेक गावांमध्ये वीज पुरवणारी यंत्रणा असली तरी, तांत्रिक अडचणींमुळे या गावांमध्ये कधीच सलग विजपुरवठा होत नाही. बहुतांश वेळा या गावातील वीजपुरवठा खंडित राहतो. गावाच्या आजूबाजूला जंगलांमध्ये हिंस्त्र वन्यपशूंचा वावर आहे. अंधारामुळे अस्वलीसारखे वन्यप्राणी केव्हाही गावात येतात. त्यातून ग्रामस्थांच्या जिविताला सतत धोका असतो.

### सन 2010 मध्ये अस्वलीने घेतला होता चौघांचा बळी

सन 2010 पासून जारिदा येथे अस्वलीच्या हल्ल्यात एकाच वेळी चार नागरिकांना जीव गमवावा लागला होता. त्यानंतर मेळघाटात अशा अनेक घटनांमध्ये जीवितहानी झालेली आहे. विजे अभावी मेळघाटातील अनेक गावांमधील रहिवाशांचे जीवन खडतर झाले आहे. पीठ गिरण्या चालत नसल्याने ग्रामस्थांना दळण्यासाठी अनेक किलोमीटरची पायपीट करावी लागते. सार्वजनिक दिवे बंद राहत असल्याने गावात सदैव अंधाराचे साम्राज्य असते. कोणतीही इलेक्ट्रॉनिक उपकरणे चालत नाहीत. मोबाईलचा फारसा वापर करता येणे शक्य नसल्याने ही गावे आजही अन्य जगापासून संपर्काच्या बाहेर आहेत. जारीदा सब स्टेशन सुरू झाले तर मेळघाटातील अनेक गावांमधील विजेची समस्या सुटून येथील आदिवासींचे जीवन सुकर होणार आहे. यासंदर्भाने आश्वासने दिली जात असली तरी राज्य आणि केंद्र सरकार सदैव उदासीन धोरण अवलंबितांनाच दिसते. आता संबंधित जनप्रतिनिधींनी पुढाकार घेऊन जारिदाचे सब स्टेशन तत्काळ सुरू करण्यासाठी प्रयत्न करावे अशी मेळघाटातील आदिवासींची मागणी आहे.

### पुढील महिनाभरात सुरु होणार सबस्टेशन



मी खासदार म्हणून निवडून आलो, त्या अगोदरपासून हा प्रश्न प्रलंबित आहे. हे जारीदा सबस्टेशन वनविभागाच्या अख्त्यारित येत असल्याने मी वन व पर्यावरण सचिवांशी याबाबत वारंवार चर्चा करुन त्याचा पाठपुरावा करित आहे. दर तीन दिवसाने मी या प्रकरणात लक्ष घालून त्याची अपडेट घेतो. आता अवघ्या महिनाभरात हे सबस्टेशन सुरु होईल अशी दाट शक्यता आहे.

**बळवंत वानखडे, खासदार, अमरावती.**

# टोंगलाबाद फाट्याजवळ चारचाकीवर हल्ला करणारे जेरबंद

## कट लागल्याच्या कारणातून झाली मारहाण

## वाटमारी नसल्याचे पोलिसांचे म्हणणे



**महासागर प्रतिनिधी**
**दर्यापूर,( दि.5 )**- येथील देशमुख परिवारातील सदस्य सोयरीक संबंधाचा कार्यक्रम आपटून सोमवार(दि.3) सायंकाळी 6 वाजता वडनेर गंगाई येथून खामगाव करिता आपल्या कळ्या रंगाची एमएच 14/ एल 1807 या चार चाकीने जात असताना ग्राम टोंगलाबाद फाट्याजवळ काही अज्ञात तरुणांनी तू हॉर्न का वाजविला असे म्हणत वाद घालुन करून संकेत देशमुख, मिलिंद देशमुख, गुणवंतराव देशमुख, श्याम देशमुख, यांना मारहाण केली. सदर चार चाकी चें काच फोडून पैशाची मागणी करून बळजबरीने मोबाईल हिसकावून घेतले.

संकेत देशमुख यांनी त्यांच्याकडून कसंतरी मोबाईल परत घेतला आणि थेट दर्यापूर पोलीस स्टेशन गाठले व त्या हल्लेखोरांविरुध्द तक्रार नोंदविली. हल्ला करणाऱ्या अज्ञात तरुणांची संख्या दहा ते बारा असल्याची प्राथमिक माहिती समोर आली आहे. सदर हल्ल्यांमध्ये देशमुख परिवारातील दोन सदस्य गंभीर जखमी झाले. याप्रकरणी गुन्हा दाखल केल्यानंतर ठाणेदार सुनील वानखडे यांच्या मार्गदर्शनात एका पथकाने तपास सुरु केला गोपनीय माहितीवरून पोलिसांनी प्रेम पुन्या भोसले (वय 25 वर्षे), जाकी पुन्या भोसले (वय 20 वर्षे), ऋतिक चंदु पवार (वय 23 वर्षे) व एक विधी संघर्षीत बालकाला या गुन्हयात ताब्यात घेतले. त्यांची चौकशी केल्यावर आरोपींनी सांगितले की, ते आपले मोटरसाइकल ने अकोला रोडने जात असतांना फिर्यादी यांचे चारचाकी वाहनाचा त्यांना कट लागला. याच कारणावरून त्यांच्यामध्ये टोंगलाबाद फाटया नजीक वाद होवून, आम्ही त्या कार मधील लोकांना मारहाण करून वाहनाची तोडफोड केल्याची कबुली दिली. सदर घटनेमध्ये कोणत्याही प्रकारची लुटमारीची अथवा वाटमारीचा प्रकार नसल्याचे तपासात निष्पन्न झाले. सदरची कारवाही पोलीस अधिक्षक विशाल आनंद, अप्पर पोलीस अधिक्षक पंकज कुमावत, उपविभागीय पोलीस अधिकारी राहुल गायकवाड यांचे मार्गदर्शनात पो.नि. सुनिल वानखडे, पोउपनी हरीहर गोरे, पोउपनी विशाल दांदळे, प्रो पोउपनी रोहीत सोनटक्के व त्यांच्या पथकाने केली.

# नेरपिंगळाईत गुलाबपुरी महाराज पुण्यतिथी महोत्सवाला सुरवात

## 3 ते 11 मार्चदरम्यान कार्यक्रमांची रेलचेल





**महासागर प्रतिनिधी**
**मोर्शी,( दि.5 )** - तालुक्यातील नेरपिंगळाईचे आराध्य दैवत श्री समर्थ गुलाबपुरी महाराज यांच्या 101 व्या पुण्यतिथी महोत्सवास 3 मार्चपासून मोठ्या उत्साहात सुरवात झाली. श्री संत गजानन महाराज यांच्या श्री विजय ग्रंथाचे मुखोद्गत वाचक शीला पुंड यांच्या मार्गदर्शनात सामुहिक पारायण करुन या उत्सवाचा प्रारंभ झाला. मोठ्या संख्येने महिला पुरुषांनी त्यात सहभाग घेतला.

या महोत्सवानिमित्त 11 मार्चपर्यंत विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. 4 ते 10 मार्चपर्यंत दररोज शिव महापुराण कथा होणार आहे. शिवयोग आश्रम सिंदीचे महामंडलेश्वर श्रीश्री 108 स्वामी कृष्णकांतानंद पुरीजी महाराज यांच्या मधुर वाणीतून सकाळी 9 ते 12 व दुपारी 3 ते 6 ही कथा होणार आहे. दररोज सकाळी काकड आरती, सायंकाळी सामुदायिक प्रार्थना, हरिपाठ तसेच रात्री साडेनऊ ते अकरा पर्यंत हरी किर्तन पार पडणार आहे.

10 मार्च रोजी दुपारी साडेतीन ते सहा वाजे पर्यंत होमहवन व 1 ते 5 पर्यंत भव्य ग्रंथ दिंडी व दिंडी स्पर्धा. 11 मार्च रोजी 9.30 वाजता हभप लक्ष्मणदास काळे महाराज यांचे काल्याचे कीर्तन व 12.15 पासून पुरणपोळीचा भव्य महाप्रसाद होणार आहे. भाविक भक्तांनी या कार्यक्रमाचा लाभ घ्यावा असे आवाहन श्री. गुलाबपुरी महाराज संस्थानने केले आहे.

# अल्पभूधारक शेतकऱ्याची मुलगी बनली ग्रामसेवक

## प्रतिकूल परिस्थितीत अंकिता ईसळची भरारी



**महासागर प्रतिनिधी**
**दर्यापूर, ( दि.5 )** - केवळ परिश्रम, जिद्द आणि चिकाटीच्या बळावर प्रतिकूल परिस्थितीवर मात करुन स्पर्धा परिक्षेत यश संपादन करित एका अल्पभूधारक शेतकऱ्याचच्या मुलीने ग्रामसेवक पदावर आरुढ होण्याचा मान मिळविला आहे. कोकर्डा येथील अंकिता ईसळ नवीन पिढीसाठी आदर्श ठरली आहे. तिने आपल्या आई-वडिलांचे स्वप्न साकार केले आहे.

अंकिताचे वडिल किशोर ईसळ हे अल्पभूधारक शेतकरी. घरची परिस्थिती बेताचीच पण तरीही त्यांनी आपल्या मुलीला उत्तम शिक्षण दिले. शिक्षणाच्या बळावर तिने जीवनात काहीतरी बनावे, हे त्यांचे स्वप्न. वडिलांची इच्छा पूर्ण करण्यासाठी अंकितानेही कुठलीच कसर शिल्लक ठेवली नाही. ग्रामसेवक पदाच्या शासकिय परिक्षेसाठी तिने तयारी केली. प्रचंड मेहनत घेउन तिने ही परिक्षा उत्तीर्ण केली. तिची ग्रामसेवक पदावर नियुक्ती झाली आह. तिचे प्राथमिक शिक्षण कोकर्डाच्या जिल्हा परिषद शाळेत झाले. सर्वोदय हायस्कुलमधेन ती दहावी उत्तीर्ण झाली. बारावीची परिक्षा तिने दर्यापूरच्या प्रबोधन विद्यालयातून उत्तीर्ण केली. त्यानंतर तिवस्याच्या आर. जी. देशमुख कृषी महाविद्यालयातून तिने पदवीचे शिक्षण पूर्ण केले.

याचवेळी तिची स्पर्धा परिक्षेची तयारीही सुरुच होती. आर्थिक परिस्थिती अत्यंत हलाखीची असताना देखील तिने अभ्यासाकडे लक्ष केंद्रित केले. 2024 मध्ये झालेल्या ग्रामपंचायत अधिकारी (ग्रामसेवक) परीक्षेचा निकाल नुकताच जाहीर झाला. यात अंकिताची ग्रामपंचायत अधिकारी या पदावर वर्णी लागली आहे. वर्धा जिल्ह्यातील देवळी पंचायत समितीमध्ये तिची निवड झाली आहे.




# अंजनगाव सुर्जीतही कोरटकर विरोधात तक्रार

## शिवभक्त संतप्त शिवप्रेमींकडून पोलिसांना निवेदन

**महासागर प्रतिनिधी**
**अंजनगाव सुर्जी,( दि.5 )** - आई जिजाऊ, छत्रपती शिवाजी महाराज, छत्रपती संभाजी महाराज यांचा अवमान करणाऱ्या, तसेच कोल्हापूरचे इतिहास संशोधक इंद्रजीत सावंत यांना धमकी दिल्या प्रकरणात प्रशांत कोरटकरचा अद्यापही पोलिसांना शोध लागलेला नाही. अंजनगाव सुर्जी पोलीस ठाण्यात शनिवारी या संदर्भात शिवप्रेमींनी तक्रार दाखल केली असता, कोरटकर याच्यावर गुन्हा दाखल करण्यार असल्याचे पोलिस अधिकाऱ्यांनी सांगितले.

गेले चार दिवस राज्यभर शिवप्रेमी बांधव प्रशांत कोरटकर (नागपूर) या व्यक्तीला महापुरुषांची बदनामी, सामाजिक तेढ व जीवे मारण्याच्या धमक्या दिल्याप्रकरणी तातडीने अटक करावी, अशी मागणी करणारी निवेदने सादर करीत आहेत. याच पार्श्वभूमीवर अंजनगाव सुर्जी तालुक्यातील शिवप्रेमींनी कोरटकर विरोधात गुन्हा दाखल करून कठोर कायदेशीर कारवाई करण्याबाबत पोलिस स्टेशन येथे निवेदन सादर केले आहे.

प्रशांत कोरटकर या व्यक्तीने इतिहास संशोधक इंद्रजीत सावंत यांना फोन कॉल करून छत्रपती शिवाजी महाराज, छत्रपती संभाजी महाराज व मां साहेब जिजाऊ यांच्याबद्दल हिणकस व गलिच्छ वक्तव्ये करून बदनामी केली आहे. तसेच संबंधित व्यक्तीने विकृत लेखक जेम्स लेन याने केलेल्या छत्रपती शिवाजी महाराज आणि मांसाहेब जिजाऊ यांच्याबद्दलच्या अत्यंत विकृत लिखाणाचे समर्थन करून तमाम शिवप्रेमींच्या भावना दुखावल्या आहेत.

मराठा समाजाला शिवीगाळ करून सामाजिक तेढ निर्माण करण्याचा प्रयत्न केला आहे. तसेच इतिहास संशोधक इंद्रजीत सावंत यांना जीवे मारण्याची धमकी दिली आहे. महाराष्ट्राच्या मुख्यमंत्र्यांचे नाव घेऊन सदर व्यक्तीने ही वक्तव्ये व धमकी दिली असल्याने हे प्रकरण संवेदनशील आहे. राज्य सरकार, गृह विभाग व पोलिस प्रशासनाने या प्रकरणाची गांभीर्याने दखल घेऊन प्रशांत कोरटकर या व्यक्तीवर तात्काळ गुन्हा दाखल केला नाही, तर सर्व शिवप्रेमींच्या वतीने राज्यभर तीव्र आंदोलन करून अत्यंत आक्रमक प्रतिक्रिया दिल्या जातील, अशा आशयाचे निवेदन अंजनगाव सुर्जी पोलिस स्टेशन येथे सादर करण्यात आले. सदर निवेदन स्विकारून कोरटकर याच्यावर गुन्हा दाखल करण्यात येणार असल्याचे पोलिस अधिकाऱ्यांनी सांगितले.

# शासकीय कर्मचाऱ्यांप्रमाणे 50 टक्के महागाई भत्ता द्या!

## महाराष्ट्र एस. टी. कामगार संघटनेचे आंदोलन



**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती,( दि.5 )** - शासकीय कर्मचार्यांप्रमाणे 50 टक्के महागाई भत्ता एस.टी. कामगारांना थकबाकीसह लागू करण्यात यावा. तसेच घरभाडे भत्ता व वार्षिक वेतनवाढीची थकबाकी एप्रिल 2016 ते ऑक्टोबर 2021 पर्यंत प्रलंबित आहे तो तातडीने देण्यात यावा या मागणीसाठी बुधवारी(दि.5) महाराष्ट्र एस. टी. कामगार संघटनेच्या अमरावती विभागाच्या वतीने विभागीय कार्यालयावर जोरदार निदर्शने करण्यात आली.

एस. टी. कामगारांना राज्य शासकीय कर्मचा-यांप्रमाणे महागाई भत्ता, घरभाडे भत्ता व वार्षिक वेतनवाढीचा दर लागू आहे. असे असताना सन 2018 पासून महागाई भत्याची थकबाकी प्रलंबित आहे. न्यायालयाने थकबाकी देण्याबाबतचा निर्णय देऊनसुध्दा अंमलबजावणी होत नाही. आता शासकीय कर्मचार्यांना माहे जुलै 2024 पासून महागाई भत्याचा दर 50 टक्के लागू केलेला असून सदरचा महागाई भत्ता थकबाकी माहे फेब्रुवारी 2025 देय मार्च 2025 च्या वेतनात देण्यात आलेला आहे. मात्र एस. टी. कामगारांना महागाई भत्ता अद्याप 46 टक्केच दिला जात आहे. त्यामुळे शासकीय कर्मचा-यांप्रमाणे 50 टक्के महागाई भत्ता एस.टी. कामगारांना थकबाकीसह लागू करण्यात यावा. तसेच घरभाडे भत्ता व वार्षिक वेतनवाढीची थकबाकी एप्रिल 2016 ते ऑक्टोबर 2021 पर्यंत प्रलंबित आहे. तो तातडीने देण्यात यावा या मागणीसाठी बुधवारी(दि.5) महाराष्ट्र एस. टी. कामगार संघटनेच्या अमरावती विभागाच्या वतीने विभागीय कार्यालयावर जोरदार निदर्शने केलीत. या वेळी कर्मचाऱ्यांनी केलेल्या घोषणाबाजीमुळे संपूर्ण परिसर दणाणून गेला होता. माहे एप्रिल 2020 पासून कामगारांच्या मूळ वेतनात 6500 रू. वाढ करून वेतन निश्चिती करण्यात आली. त्यानंतर माहे एप्रिल 2020 ते मार्च 2024 या कालावधीच्या थकबाकीबाबत नंतर निर्णय घेण्याचे मान्य केलेले आहे. माहे एप्रिल 2024 पासून वाढीव वेतन रोखीने देण्याच्या सूचना असून सदर थकबाकीचे हमे माहे जानेवारी 2025 देय फेब्रुवारी 2025 मध्ये संपलेले आहेत. त्यामुळे कामगारांचे वेतन कमी होणार आहे. परिणामी कामगारांत असंतोष पसरलेला आहे. म्हणून निरनिराळ्या बाबींच्या अधिन राहून सध्या कामगारांना मिळत असलेले बाकीचे हसे तसेच पुढे चालू ठेवणे आवश्यक आहे. तसेच भविष्य निर्वाह निधीची उचल वेळेवर द्या, जाचक शिस्त व आवेदन कार्यपध्दती रद्द करा, प्रवाशी भाड्या केलेल्या भावाची अंमलबजावणी करताना पुर्वीप्रमाणे रू. 5 च्या पटीत वाढ करा, आर. टी. ओ. विभागाकडून दंडात्मक कारवाई करताना चालकाचा दोष नसताना केलेली दंडात्मक कारवाई रद करा, यासह अन्य मागण्या यावेळी करण्यात आल्या.

# रेवसा पुनर्वसन येथे तरुणाला काठीने मारहाण

**अमरावती** - रेवसा पुनर्वसन येथे एका तरुणाला काठीने मारहाण करण्यात आली. या घटनेची तक्रार निलेश बाळकृष्ण पारीसे (35, रा. रेवसा पूनर्वसन) यांनी 1 मार्च रोजी वलगाव पोलिस ठाण्यात दिली. त्यानुसार पोलिसांनी आरोपी विलास रामकृष्ण पारीसे (32, रा. रेवसा पूनर्वसन) याच्याविरुध्द विविध कलमान्वये गुन्हा नोंदविला आहे.

# उदय देशपांडे यांचा सेवानिवृत्तीनिमित्त सत्कार

**अचलपूर** - आयईएस गर्ल्स हायस्कूल परतवाडा येथील गणित विषयाचे शिक्षक उदय देशपांडे सेवानिवृत्त झाले. त्या अनुषंगाने शाळेच्या वतीने निरोप समारंभाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मुख्याध्यापिका विद्या मु-हेकर या होत्या. उपस्थित मान्यवरांच्या हस्ते उदय देशपांडे आणि त्यांच्या अर्धांगिनी राजश्री देशपांडे यांचा सपत्नीक सत्कार करण्यात आला. बीएससी बीएड शिक्षण घेतल्यानंतर गणित विषयात पारंगत असलेल्या देशपांडे यांनी आयईएस गर्ल्स शाळेवर रुजू होत विद्यार्थ्यांना ज्ञानाचे धडे दिले. याप्रसंगी सुनंदा देशपांडे, दिनकर देशपांडे, अरुण राणे, भालचंद्र मुन्हेकर, सुधीर ठवळी, आदींची उपस्थिती होती.

# शुद्ध पाण्याचा 'अशुद्ध' व्यवसाय नागरिकांच्या जिवावर

## दररोज लाखो लिटर पाण्याची अनधिकृत विक्री ■ शासन आदेशाला हरताळ



**महासागर प्रतिनिधी**
**पथ्रोट,( दि.5 )**- अन्नसुरक्षा प्राधिकरणाने नुकताच बाटलीबंद पाण्याचा अतिधोकादायक यादीत समावेश केला आहे. मात्र, तरीही शासनाचे नियम धाब्यावर बसून दररोज लाखो लिटर बाटलीबंद पाण्याची अनधिकृत विक्री होत आहे. नागरिकांच्या जिवाशी खेळणारे असे शेकडो प्रकल्प शहरासह तालुक्यातील गावात कार्यरत आहेत.

आरोग्यास अपायकारक ठरणारे पाणी व भूगर्भातून अमर्याद पाणी उपसा करणारे सर्व पाणी प्रकल्प बंद करण्याचे राष्ट्रीय हरित लवाद व महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने दिलेल्या आदेशात म्हटले आहे. मात्र, या आदेशाला हरताळ फासत प्रशासनाच्या आशीर्वादामुळे हे प्रकल्प सुरू आहेत. सध्या बिनधास्तपणे अचलपुर, अंजनगाव तालुक्यासह जिल्ह्यात बाटलीबंद पाण्याचा व्यवसाय तेजीत सुरू आहे. पिण्यासाठी बाटलीबंद शुद्ध पाण्याचा पर्याय सहज उपलब्ध झाला असून आता पाणी बॉटल विकत घेणे प्रतिष्ठेचे लक्षण मानले जाते. प्रत्येक हॉटेलवर मीनरल वॉटरचा सर्रास वापर केला जातो. मंगल कार्यालय, घर, पर्यटनास्थळांसह विविध गावच्या यात्रांमध्येही बाटलीबंद पाण्याची मागणी वाढत आहे. पूर्वी हजारात होणारी पाण्याची विक्री आज लाखोंच्या घरात पोहोचली आहे. तालुक्यात अनेक घरांमध्ये विहिरी किंवा कूपनलिकांच्या पाण्याला आरो फिल्टर मशीन बसवून पाण्याची विक्री होत आहे. यातील विहिरी आणि कूपनलिकांचे पाणी शंभर टक्के शुद्ध होत नसल्याने यातून अनेक आजारांना निमंत्रण मिळते. वापरलेल्या बाटल्यांमध्ये नळाचे पाणी भरून मीनरल वॉटरच्या नावाखाली अनेक जण ते विकत आहेत.

### प्रशासकीय यंत्रणांचे दुर्लक्ष

आगामी काळात येणाऱ्या यात्रा, जत्रांमध्ये शुद्ध पाण्याचा अशुद्ध व्यवसाय चालूच राहणार आहे. गावोगावी कूपनलिका घेऊन नागरिकांनी सरकारी गायरान जागेमध्ये अनधिकृत विजेचा वापर करत आरो फिल्टर बसवले आहेत. संबंधित विभागाचा परवाना न घेता पाणी विक्रीचा व्यवसाय जोरात सुरू आह, याकडे अन्न व औषध प्रशासन, प्रदूषण नियंत्रण मंडळ, आरोग्य विभाग आणि स्थानिक प्रशासनाचे पूर्णपणे दुर्लक्ष झाले आहे. या व्यवसायाला लगाम घालणाऱ्या सरकारी यंत्रणेला जाग आणण्याची नितांत गरज आहे.

### पाण्याच्या चाचण्या करणे बंधनकारक

शासनाच्या नियमाप्रमाणे पाण्याचा व्यवसाय करणाऱ्या आरो फिल्टर विक्रेत्यांना दररोज चाचण्या करूनच पाणी विक्री करावी लागते. या व्यवसायासाठी अन्न व औषध प्रशासन विभागाचा परवाना घेणे बंधनकारक आहे. पाण्याची शुद्धता व शुद्धतेसाठी वापरलेल्या घटकांची माहिती बाटलीच्या लेबलवर द्यावी लागते. यापुढे त्रयस्थ कंपनीकडून याची तपासणी होणार आहे

## जाहीर नोटीस

सर्व सामान्य लोकांना सूचित करण्यात येते की, मी व माझे पक्षकार नामे रावलसिंग दुर्गसिंह राजपुरोहित यांच्या वतीने सदरची जाहीर नोटिस देतो ती, येनेप्रमाणे, मिळकतीचे वर्णन -मौजे-दर्यापूर, प्लॉट क्रं. 78, शेत सर्वे क्रं. 117/1/A, ता. दर्यापूर जिल्हा. अमरावती.

चतु. सीमा: **पूर्वे:** लेआऊट रस्ता, **उत्तर:** लेआऊट प्लॉट क्र. 77,
**पश्चिम:** लेआऊट प्लॉट क्र. 85 **दक्षिण:** प्लॉट क्रं. 79

सदर मिळकत माझे पक्षकार रावलसिंग दुर्गसिंह राजपुरोहित हे, विनोद नामदेवराव हुतके यांनी दि. 09/02/2022 रोजीचे दस्त. क्रं. 417 नुसार खरेदी केलेली मिळकत विकत घेण्याचा सौदा झाला आहे. तदनंतर, त्यांनी Mahindra Rural Housing Finance Limited ("MRHFL"). येथे कर्जाकरीता अर्ज केला असता. वरील वर्णनाचे मूळ खरेदीखत दि. 26.03.2012 रोजीचे दस्त क्र. 787 आणि दि. 17.03.2017 रोजीचे दस्त क्र. 458 सदर दस्त गहाळ झालेले आहे. तसेच वरील नमूद दस्त कोणाला सापडल्यास किवा कुठे गहान/राष्ट्रीयकृत/खाजगी//पतसंस्था/सहकारी/इतर बँक बोजा, सदर मालमत्तेवीषयी शासकीय-नीमशासकीय इतर भानगड, कोनाचा मालकी/वारस हक्क किवा इतर आक्षेप असल्यास खाली दिलेल्या माझ्या मो. क्रं. वर ही जाहिरात प्रसिद्ध झाल्याच्या 7 दिवसाच्या आत पुराव्यानीशी हरकत नोंदवावी तद्नंतर कोणतीही हरकत ग्राह्य धरल्या जाणार नाही ही विनंती.

शिक्का

आपला
ADVOCATE
रवींद्र रू. वाटाणे
स्नेहगंधा कॉलोनी,अमरावती
मो. नं. 9823698745

